संपूर्ण महाराष्ट्रात प्रसार पावलेले
सातारी बाण्याचे प्रमुख साप्ताहिक
३६
dhansantosh123@gmail.com
मोबा. 9822107981

# धनसंतोष

■ संस्थापक । श्री. भाऊसाहेब नलावडे ■ संपादक । सौ. विमल नलावडे ■ PRN No.-STR/009/2018-2020

। वर्ष ३६ वे । । अंक २८ वा । । शनिवार दि. ३०।११।२०१९ । पाने ४ । २ रुपये

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय

# रयतच्या लाईफ मेंबर बोर्ड अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत

कोरेगाव । रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ मेंबर बोर्डाच्या अध्यक्षपदी डी.पी. भोसले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. डॉ. सावंत हे रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव, मेनेजिंग कौन्सिल सदस्य, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल सदस्य तसेच विद्या प्रसारक मंडळ कोरेगावचे सचिव म्हणूनही काम पहात आहेत. कारेगाव एज्युकेशन सोसायटीच्या वाघोली येथील शंकरराव जगताप महाविद्यालय विकास समितीचे सदस्य आणि शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोशिएशनचे ते खजिनदार आहेत.

त्यांनी प्राचार्य व सहसचिव पदाच्या काळात महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करुन दिली असून त्यांच्या काळात महाविद्यालयाला A ग्रेड मिळाली. कोरेगाव व पंचक्रोशीतील बहुजन समाजातील मुलामुलींच्या पदव्युत्तर शिक्षणाची सोय होण्याच्या दृष्टीने एम.ए. (इंग्रजी, मराठी, भूगोल, अर्थशास्त्र), एम.एस्सी. (रसायनशास्त्र) या विषयांचे अभ्यासक्रम सुरु केले. शिक्षणाबरोबर व्यावसायिक व शेतीविषयक कौशल्य प्राप्त होण्यासाठी महाविद्यालयात बी.व्होक. (ॲग्रीकल्चर हा पदवी स्तरावर अभ्यासक्रमही सुरु करण्यात आला आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच महाविद्यालयाचा भौतिक विकासही केला आहे.



प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांचा सत्कार करताना महाविद्यालयातील शिक्षक सहकारी व सेवक वर्ग.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन रयत शिक्षण संस्थेने त्यांची लाईफ मेंबर बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड केली आहे.

या त्यांच्या निवडीबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आ.डॉ. विश्वजित कदम, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. भाऊसाहेब कराळे, उपप्राचार्य डॉ. एस.डी. जाधव, डॉ. व्ही.जे. वाडते, शिक्षक-शिक्षकेतर सेवक-विद्यार्थ्यांनी, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.